Progressive Education Society's
# MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE (Autonomous)
Ganeshkhind, Pune - 411 016.

# NOTICE

To be put up on — To be removed on

Class

दिनांक १६-०५-२०२४

विषय- मार्च / एप्रिल २०२४ सत्राच्या विशेष परीक्षांचे आयोजन करणेबाबत...

मा. महाविद्यालयीन (Board of Examination and Evaluation) अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार मार्च / एप्रिल २०२४ (आयोजन मे २०२४) परीक्षेच्या कालावधीमध्ये जे विद्यार्थी विद्यापीठीय, राज्य, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरील सांस्कृतिक, कीडास्पर्धा, मा. कुलपती यांनी वेळोवेळी निर्देशित केलेल्या स्पर्धा तसेच मा. व्यवस्थापन परिषदेने वेळोवेळी मान्य केलेल्या स्पर्धामध्ये व इतर कार्यक्रमामध्ये, सहभागी होणारे/झालेले असतील तसेच राष्ट्रीय सेवायोजना व राष्ट्रीय छात्रसेना योजना यामध्ये सहभागी होणारे/झालेले असतील अशा पात्र विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा आयोजनाची पर्यायी व्यवस्था करण्यात येत आहे. समकक्ष विषय व इतर कारणांमुळे विद्यापीठ परीक्षा एकाच दिवशी येत असेल तसेच एकाच वेळेस दोन विषयांची परीक्षा येत असल्यास आणि केंद्रिय प्रवेश प्रकिया (CET) राष्ट्रीय पात्रता चाचणी (NET), राज्यस्तरीय पात्रता चाचणी (SET), CA., CMA, UPSC, MPSC इत्यादी तत्सम परीक्षा व विद्यापीठ परीक्षा एकाच दिवशी येत असल्यास अशा पात्र विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा आयोजनाची पर्यायी व्यवस्था करण्यात येत आहे.

उपरोक्त नमूद पात्र असणाऱ्या व परीक्षा अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा आयोजनाबाबत पर्यायी व्यवस्था म्हणून विशेष परीक्षांचे आयोजन करण्यात येईल. त्या करीता विद्यार्थ्यांनी आपले अर्ज महाविद्यालयात सर्व कागदपत्रांसह जमा करावे व मा. प्राचार्य / संचालक यांनी सदर अभ्यासक्रमाची परीक्षा संपल्यानंतर प्राधान्यक्रमाने सर्व कागदपत्रांसह संबंधित विद्यार्थ्यांचे विशेष परीक्षा आयोजनाचे प्रस्ताव परीक्षा विभागास दिलेल्या विहित मुदतीत सादर करावेत. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जानुसार केवळ पात्र विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा आयोजित करण्यात येईल व त्याबद्दल वेळोवेळी अवगत करण्यात येईल.

वरील विषयास पात्र असणा-या विध्यार्थ्यानी आपले परीक्षा अर्ज महाविद्यालय कार्यालयात जमा करावेत सदर अर्ज जमा करण्याची अंतिम मुदत २२ मे २०२४ पर्यत असेल, त्यानंतर येणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.सदर परीक्षेचे वेळापत्रक व माहिती ही फक्त महाविद्यालय वेबसाईट वर उपलब्ध राहील याची सर्व विद्यार्थ्यानी नोंद घ्यावी.

Web Site :- www.moderncollegegk.org

उप-प्राचार्य ( परीक्षा विभाग )

Modern College (Autonomous) Ganeshkhind, Pune-16.

प्राचार्य